प्रेसनोट दि.०१/११/२०१७

## भारत सरकारने रद्दपात्र ठरविलेल्या जुन्या १००० रुपये दराच्या व ५०० रुपये दराच्या नोटा बेकादेशीरपणे जवळ बाळगुन, त्याचा साठा करणाऱ्या टोळीस गुन्हे शाखा घटक १ ठाणे व मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष ठाणे यांच्याकडुन गजाआड

### १) मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष ठाणे यांचेकडुन करण्यात आलेली कारवाई

दि. ३१/१०/२०१७ रोजी मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, भारतीय चलनातुन बाद झालेल्या १०००/—रु व ५००/—रु दराच्या चलनी नोटा एका सफेद रंगाची स्कोडा मोटार वाहन क. MH04/FV/9099 या वाहनामधुन ४ ते ५ इसम २०.०० वा. पलावा सिटी, मानपाडा, डोंबिवली येथील लक्ष्मी हॉटेलच्या समोर रोडवर घेवुन येणार असल्याची खात्री लायक बातमी मिळाली होती. मिळालेल्या बातमीचे ठिकाणी सापळा रचुन, पलावा सिटी, मानपाडा, डोंबिवली येथील लक्ष्मी हॉटेलच्या समोर रोडवर इसम नामे १) अजित माधवराव सुर्वे वय ५७ वर्षे रा. गोपाळबाग, बी/२०२, डी.एन.सी. स्कुलचे पाठीमागे, सुनिलनगर, हनुमाननगर, डोंबिवली पुर्व २) रविंद्र भास्कर चौधरी वय ३४ रा.डी/२०३, न्यु देविप्रसाद को.ऑ.हौ.सोसायटी, लालचौकी कल्याण पश्चिम. ३) पदमसिंग प्रेमसिंग बिष्ट वय २७ वर्षे रा. कारावेगाव, माऊली को.ऑ.हौ.सोसायटी, रुम नं. ३०२, नेरुळ सेक्टर नं.३६, नवी मुंबई ४) प्रकाश उर्फ सुनिल कौतीक पाटील वय ३४ वर्षे रा. आशाळेपाडा, गणेश कॉलनी, रुम नं. १, उल्हासनगर—४ यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन स्कोडा मोटार वाहन क. MH04/FV/9099 वाहनाचे पाठीमागील डीक्कीमध्ये भारतीय चलनातुन बाद झालेल्या १००० रुपये दर्शनी मुल्य असलेल्या एकुण १९६९१ नोटा व ५०० रुपये दर्शनी मुल्य असलेल्या एकुण २६८ नोटा अशा एकुण १,९८,२५,०००/—रु किंमतीच्या नोटा तसेच मोबाईल फोन इत्यादी वस्तु जप्त केल्या. भारत सरकारने नोटबंदी नंतर दिलेल्या कालावधीत सदरच्या नोटा बदलुन न घेता तसेच सदरच्या नोटा ह्या कायदेशिररीत्या भारतीय चलनात आणण्यासाठी प्रतिबंधीत झालेल्या आहेत हे माहित असताना देखील स्वेच्छेने स्वत:च्या ताब्यात सदर नोटांचा साठा बेकायदेशीररीत्या करुन ताब्यात बाळगला असताना मिळुन आलेले आहेत.

### २) गुन्हे शाखा,घटक—१ ठाणे यांचेकडुन करण्यात आलेली कारवाई

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी सायंकाळी १९:४५ वाजता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन ठाकरे सो त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दिनांक ३०/१०/२०१७ रोजी रात्रौ काही इसम हे त्यांचेकडील भारतीय चलनातुन रद्द केलेल्या चलनी १०००/— रू. व ५००/—रू. दराच्या नोटा हया बदली करून नवीन नोटा घेणेकरीता नौपाडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील हरिनिवास सर्कल येथे वाहनातुन येणार आहेत. सदर बातमीचे अनुषंगाने हरिनिवास सर्कल येथे सापळा कारवाई करून आरोपीत नामे उमेश हनुमंता शिरसेकर, वय २८ वर्षे, रा.— नथुशेठ चाळ, स्वत:चे घर, शंकरमदीरा जवळ, आनंद नगर, विटावा, जि.— ठाणे यास त्याचे ताब्यात असलेली फोर्ड कार वाहन क्रमांक एम.एच./०१— व्ही.अे./११५१ हिचेसह ताब्यात घेण्यात आले आरोपीत याचे ताब्यातील कारची झडती घेतली असता सदर कारचे मागील डिक्कीत एक लाल काळे रंगाची रेग्झीनची बॅग मध्ये भारतीय चलनातुन रद्द केलेल्या चलनी १०००/— रू. दराच्या ४,९०० नोटा व ५००/—रू. दराच्या १७,९०० नोटा असे एकुण १,३८,५०,०००/— रूपये मुल्य असलेली रक्कम व त्याचे ताब्यातील २,००,०००/—रू. किमंतीची गोल्डन रंगाची फोर्ड कार वाहन क्रमांक एम.एच./०१— व्ही.अे./११५१ जप्त करण्यात आलेली आहे. आरोपीत याचे ताब्यात मिळुन आलेली वरील रक्कम त्याने कोठुनतरी लबाडीने, कपटाने चोरी अगर बेकायदेशिररित्या प्राप्त करून जवळ बाळगल्याने वरील रक्कम व वाहन सी. आर. पी.सी कलम

ड) प्रमाणे ताब्यात घेवुन त्याचे विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कल १२४
रकातर्फे चलनातुन रद्द केलेल्या १०००/– रू, व ५००/–रू. दराच्या
ळ बाळगल्याने The Specified Bank Notes ( Cessation of Liabi
मधील कलम ५ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास गुन्हे श
डील पोलीस उप निरीक्षक डी.बी.सरक हे करीत आहेत.

नमुद कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. परम वीर सिंग, मा. सह पोलीस अ
ा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. मकरंद रानडे, पोलीस उप आयुक्त गुन्
पोलीस उप आयुक्त आर्थिक गुन्हे डॉ.संदिप भाजीभाकरे व मा. गुन्हे, श्री.
ा.पोलीस आयुक्त श्री.एन.टी.कदम यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निर
ुन्हे शाखा, घटक–१, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, व त्यां
ाहे.


महाराष्ट्र पोलीस

